अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड । गुरुवार
०८.१०.२०२६
वरुड दर्पण
जनसामान्यांच्या मनातील आरसा
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २४९ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
संपादक - चंद्रकांत भा. भड
+91 7745067712

# दमदार अभिनयाचा बुलंद आवाज हरपला : ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने कलाविश्वावर शोककळा

## हृदयविकाराचा झटका : रुग्णालयात ४५ मिनिटे सीपीआर, तरीही जीव वाचला नाही

## वयाच्या ७५व्या वर्षी अखेरचा श्वास

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – आपल्या दमदार अभिनयाने आणि खास संवादफेकीने अनेक पिढ्यांच्या प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांचे आज, गुरुवारी (दि.८) वयाच्या ७५ व्या वर्षी निधन झाले. त्यांना तीव्र छातीत दुखत असल्याची माहिती मिळाल्यानंतर वैद्यकीय पथक गोव्यातील डोना पावला येथील त्यांच्या फ्लॅटवर पोहोचले. मात्र, त्यावेळी नाना पाटेकर प्रतिसाद देत नव्हते. त्यांना सीपीआर देण्यात आला आणि त्यानंतर तातडीने मणिपाल रुग्णालयात नेण्यात आले. मात्र, रुग्णालयातील वैद्यकीय पथकाने सकाळी ५.२० वाजता त्यांना मृत घोषित केले. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने त्यांचे निधन झाल्याचे प्राथमिक वृत्त आहे.






**रुग्णालयात ४५ मिनिटे उपचाराचे प्रयत्न**

रुग्णालयात दाखल केल्यानंतर डॉक्टरांनी सुमारे ४५ मिनिटे सीपीआर देत नाना पाटेकर यांना वाचवण्याचे प्रयत्न केले. मात्र, उपचारांना प्रतिसाद मिळाला नाही. आज त्यांचे शवविच्छेदन करण्यात येणार असल्याची माहिती मणिपाल रुग्णालयाचे डॉ.शेखर साळकर यांनी दिली.

**शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार**

दरम्यान, नाना पाटेकर यांच्या पार्थिवावर पुण्यातील सिंहगडाच्या पायथ्याशी असलेल्या डोणजे गावातील त्यांच्या शेतातच संध्याकाळी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे. मराठी नाटकासह मराठी आणि हिंदी सिनेमातील त्यांच्या अतुलनीय योगदानाची दखल घेत हा निर्णय घेण्यात आल्याची माहिती सांस्कृतिक कार्यमंत्री अ‍ॅड. आशिष शेलार यांनी दिली. त्यांनी सोशल मीडिया पोस्टद्वारे याबाबत माहिती दिली.

**अभिनयाची वेगळी शैली**

नाना पाटेकर यांनी आपल्या प्रदीर्घ कारकिर्दीत अभिनयाची एक वेगळी शैली निर्माण केली. गंभीर आणि संवेदनशील भूमिकांपासून विनोदी आणि खलनायकी भूमिकांपर्यंत त्यांनी विविध व्यक्तिरेखा साकारल्या. प्रभावी संवादफेक, सहज अभिनय आणि वैशिष्ट्यपूर्ण शैलीमुळे त्यांनी प्रेक्षकांच्या मनात अढळ स्थान निर्माण केले.

**नानांच्या जाण्याने हळहळ; मान्यवरांकडून श्रद्धांजली**

### गाजलेले चित्रपट

सिंहासन, अंकुश, सलाम बॉम्बे!, परिंदा, थोडासा रूमानी हो जाएँ, प्रहार : द फायनल अटॅक, अंगार, क्रांतिवीर , अग्निसाक्षी, खामोशी : द म्युझिकल, यशवंत, वजूद, अब तक छप्पन, अपहरण, टॅक्सी नंबर ९२११, वेलकम, राजनीती, नटसम्राट, काला, तडका, द व्हॅक्सिन वॉर, ओले आले, वनवास, हाउसफुल ५.

### व्यक्तिमत्त्वाचा ठसा

परखड विचार, दमदार आवाज, समाजातील अन्यायाविरुद्ध भूमिका, शेतकरी, मजूर आणि सामान्या माणसांच्या प्रश्नीच नेहमीच स्पष्ट मत मांडणारे नाना पाटेकर हे केवळ अभिनेते नव्हते, तर संवेदनशील आणि जिव्हाळ्याचे व्यक्तिमत्त्व होते.

“मी कधीच हिरो नव्हतो, मी फक्त माणूस आहे...”
- नाना पाटेकर

नाना पाटेकर यांच्या निधनाची बातमी समोर आल्यानंतर मनोरंजन क्षेत्रासह सामाजिक आणि विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी शोक व्यक्त केला आहे. अनेकांनी सोशल मीडिया पोस्ट आणि व्हिडीओच्या माध्यमातून नाना पाटेकर यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली वाहिली. त्यांच्या जाण्याने एक उत्तम कलाकार आणि माणूस गमावल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. भाजप नेत्या स्मृती इराणी यांनी नानांसोबतचा स्वयंपाक करतानाचा खास व्हिडीओ शेअर करत त्यांच्यासोबतच्या आठवणींना उजाळा दिला आहे.

**नानांना त्या प्रेमाने ‘दादा’ म्हणायच्या.**

नाना पाटेकर यांच्यासोबतच्या आठवणी, त्यांचा साधेपणा, आपुलकी आणि व्यक्तिमत्त्वाचा अनेकांनी आपल्या पोस्टमधून उल्लेख केला आहे. नाना पाटेकर यांच्या निधनाचे वृत्त समोर आल्यानंतर हिंदी आणि मराठी चित्रपटसृष्टीसह त्यांच्या चाहत्यांमध्ये शोककळा पसरली आहे. त्यांच्या निधनाने मनोरंजन विश्वात कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे.


नाना पाटेकर यांच्यासारखी विलक्षण तीव्रता, वेगळेपण आणि प्रभाव फारच मोजक्या अभिनेत्यांमध्ये पाहायला मिळतो. – **नरेंद्र मोदी**


महाराष्ट्राच्या मातीतला रांगडा आणि तितकाच संवेदनशील अभिनेता आपण गमावला.
– **देवेंद्र फडणवीस**


नाना जींसारखा अष्टपैलू आणि मनस्वी कलाकार पुन्हा होणे नाही; त्यांच्या आठवणी सदैव मनात राहतील. **–अक्षय कुमार**


नाना पाटेकर यांचे निधन कला जगतासाठी मोठी हानी असून, महाराष्ट्राने एक प्रतिभावंत कलाकार गमावला आहे.**–अ‍ॅड आशिष शेलार**


नाना पाटेकर के निधन से कला जगत ने एक असाधारण कलाकार और संवेदनशील इंसान खो दिया; उनका योगदान और सेवा सदैव याद रखी जाएगी। – **कमल हासन**


पाटेकर हे अतुलनीय कलाकार आणि पडद्याबाहेरही खऱ्या अर्थाने लोकनायक होते; त्यांच्या जाण्याने एका युगाचा अंत झाला. **–रितेश देशमुख**











✼ मराठी आणि हिंदी सिनेसृष्टी आपल्या दमदार अभिनयाने गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर हे केवळ त्यांच्या अभिनयासाठीच नव्हे, तर त्यांच्या प्रखर राष्ट्रप्रेमासाठीही ओळखले जातात. तीन वेळा राष्ट्रीय पुरस्कार जिंकणाऱ्या नाना

## नाना पाटेकरांचा कारगिल युद्धातील ‘तो’ थरारक किस्सा! पडद्यावरच नाही, तर सीमेवरही नडलेला ‘नटसम्राट’

पाटेकर यांनी आपल्या करिअरच्या शिखरावर असताना देशसेवेसाठी काही काळ अभिनयातून ब्रेक घेतला होता. १९९९ च्या कारगिल युद्धात त्यांनी प्रत्यक्ष सीमेवर जाऊन भारतीय सैनिकांसोबत सहभाग नोंदवला होता.

**कारगिल युद्धाच्या वेळी थेट संरक्षकमंत्र्यांशी संपर्क**

१९९९ मध्ये जेव्हा भारत आणि पाकिस्तानमध्ये कारगिल युद्ध पेटले होते, तेव्हा नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाच्या



यशस्वी कारकिर्दीला बाजूला ठेवत सीमेवर जाण्याचा निर्णय घेतला. ९० च्या दशकात ‘प्रहार’ चित्रपटाच्या पटकथा लेखनादरम्यान त्यांनी ’मराठा लाईट इन्फंट्री’सोबत सलग तीन वर्षे लष्करी प्रशिक्षण घेतले होते. यानंतर नाना पाटेकर यांनी थेट तत्कालीन संरक्षणमंत्री जॉर्ज फर्नांडिस यांच्याशी संपर्क साधून सीमेवर जाण्याची परवानगी मिळवली.

**१५ दिवसांत १५ ते २० किलो वजन घटले**

ऑगस्ट १९९९ मध्ये नाना पाटेकर यांनी नियंत्रण रेषेच्या अत्यंत जवळ सुमारे १५ दिवस घालवले. या काळात त्यांनी सैनिकांना मदत केली तसेच बेस हॉस्पिटलमध्ये जखमी जवानांची सेवाही केली. एका टॉक शो दरम्यान त्यांनी या अनुभवाचा उल्लेख करताना सांगितले होते की, ‘जेव्हा मी श्रीनगरला पोहोचलो तेव्हा माझे वजन ७६ किलो होते.

## ...तर महापौरांविरोधात वॉरंट जारी करू! न्यायालयाचा इशारा

■ (प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – ऊर्दू माध्यमाच्या शाळेतील शिक्षकांना कथित मारहाण केल्याप्रकरणी २०१६ मध्ये नोंदवलेल्या खटल्यात सतत अनुपस्थित राहिल्याबद्दल सत्र न्यायालयाने महापौर रितू तावडे यांना फटकारले आहे. न्यायालयाने त्यांच्यावर १ हजार रुपयांचा दंड ठोठावला असून पुढील सुनावणीला हजर न राहिल्यास त्यांचा जामीन रद्द करून वॉरंट जारी करण्याचा इशारा दिला आहे. बुधवारी या खटल्याच्या सुनावणीदरम्यान तावडे यांचे वकील दुर्गा राजपूत यांनी रितू तावडे यांच्या



वैयक्तिक उपस्थितीपासून कायमस्वरूपी सूट देण्याची विनंती करणारा अर्ज दाखल केला. तावडे या मुंबईच्या प्रथम नागरिक असून पालिकेच्या विविध कार्यक्रमांमुळे त्यांचा दिवस अतिशय व्यस्त असतो, असा युक्तिवाद त्यांनी केला. मात्र, हा खटला ७ वर्षे जुना आहे या मुद्द्यावर सरकारी वचक इक्बाल सोळकर यांनी या अर्जाला विरोध केला.

### २ ते ३ वर्षांपासुन शासनाकडे देयक अडल्याने

# शासकीय कंत्राटदार सुनील वागद्रे यांची गळफास घेवुन आत्महत्या

■ (प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – गेल्या २ ते ३ वर्षांपासुन शासनाकडे देयक अडल्याने आर्थीक चणचणीत असलेल्या शासकीय कंत्राटदार सुनील वागद्रे यांनी गळफास घेवुन आत्महत्या केल्याची घटना काल (ता.७) रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.

सुनील वागद्रे यांच्या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. शासकीय कंत्राटदारीच्या माध्यमातून त्यांनी आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या विविध शासकीय कामांची कोट्यवधी रुपयांची देयके शासनाकडे प्रलंबित असल्याची चर्चा असून शासनाने एका हरहुन्नरी व्यक्तीमत्वाचा बळी घेतल्याचे बोलल्या जात आहे.

सुनील वागद्रे यांनी अत्यंत सामान्य परिस्थितीतून सुरुवात करून कंत्राटदारीच्या क्षेत्रात स्वतःचे स्थान निर्माण केले. मेहनत, चिकाटी आणि व्यावसायिक कौशल्याच्या जोरावर त्यांनी शासकीय कामे मिळवून आपली कारकीर्द उभी केली. अनेक वर्षांच्या परिश्रमातून त्यांनी व्यवसायाचा विस्तार केला आणि या क्षेत्रात



आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली.

मात्र शासकीय कंत्राटदारांसमोर काम पूर्ण केल्यानंतर देयके वेळेवर न मिळण्याचा प्रश्न अनेकदा निर्माण होत असतो. कामासाठी लागणारा खर्च, मजुरी, साहित्य, वाहतूक तसेच इतर व्यावसायिक देणी भागविताना कंत्राटदारांना आर्थिक ताण सहन करावा लागतो. अशा परिस्थितीत मोठ्या रकमेची देयके दीर्घकाळ प्रलंबित राहिल्यास त्याचा व्यवसायावर परिणाम होण्याची शक्यता असते. वागद्रे यांच्या बाबतीतही कोट्यवधी रुपयांची शासकीय देयके प्रलंबित असल्याची चर्चा आहे.

सतत हसतमुख राहणारे आणि प्रत्येकाशी जिव्हाळ्याने संबंध ठेवणारे सुनील वागद्रे यांच्या अचानक जाण्याने त्यांच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवार व व्यावसायिक क्षेत्रातील सहकाऱ्यांना मोठा धक्का बसला आहे.

मुलगी अमरावती येथे शिक्षण घेण्यासाठी राहात होती, अशातच आई सुध्दा अमरावतीला तिच्या भेटीसाठी गेली होती, काल सायंकाळच्या सुमारास सुनील हे शेतामध्ये गेले आणि रात्र होवुन सुध्दा ते घरी न परतल्याने काही गावकरी व नातेवाईक शेताकडे त्यांचा शोध घेण्याकरीता शेताकडे आले असता त्यांचा मृतदेह एका झाडाला लटकलेल्या स्थितीत आढळून आला. त्यानंतर अनेकांनी शेताकडे धाव घेतली, पोलिसांना पाचारण करण्यात आले, पंचनामा करुन मृतदेह ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनाकरीता रवाना करण्यात आला.

आज सकाळच्या सुमारास त्यांच्या पार्थिवाचे शवविच्छेदन झाल्यानंतर जरुड येथील हिंदु स्मशानभुमि येथे स्वकीय, आप्तेष्ट, नातेवाईक आणि गावकऱ्यांच्या उपस्थितीत त्यांच्यावर अत्यंत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -१४९५६० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - १३७११०रु.(१०ग्रॅम)

चांदी - २,४५,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी - | १६५० - | २००० |
| गहू - | २५०० - | ३००० |
| तूर - | ६१०० - | ६३९० |
| मूग - | ६५०० - | ७००० |
| उडीद - | ६००० - | ७००० |
| हरभरा - | ५६०० - | ५९०० |
| सोयाबिन - | ४१०० - | ४३५० |
| बाजरा - | २००० - | २३०० |
| तिळ - | ८२०० - | ९३०० |
| भुईमूग - | ५१५० - | ५३५० |

# फडणवीसांच्या भेटीची कंत्राटदारांची मागणी : ८६ हजार कोटींची बिले थकीत

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**मुंबई** – महाराष्ट्रातील सरकारी कामांची सुमारे ८६ हजार कोटी रुपयांची बिले थकीत असल्याचा दावा करत महाराष्ट्र राज्य कंत्राटदार संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची तातडीने भेट घेण्याची मागणी केली आहे. दीर्घकाळापासून देयके प्रलंबित असल्याने राज्यभरातील कंत्राटदार गंभीर आर्थिक संकटात सापडल्याचे संघटनेने म्हटले आहे.

विविध सरकारी विभागांसाठी पायाभूत सुविधा आणि विकासकामे पूर्ण करूनही कंत्राटदारांना त्यांची देयके मिळालेली नसल्याचा संघटनेचा आरोप आहे. मुख्यमंत्री आणि मुख्यमंत्री कार्यालयाकडे वारंवार भेटीसाठी वेळ मागूनही प्रतिसाद मिळत नसल्याचेही संघटनेने म्हटले आहे.

सार्वजनिक बांधकाम, ग्रामविकास, आदिवासी विकास तसेच जलजीवन मिशनअंतर्गत मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित असल्याचे कंत्राटदार संघटनांचे म्हणणे आहे. थकीत बिले तातडीने अदा करावीत, तसेच मोठ्या प्रमाणात देयके प्रलंबित राहण्यामागील कारणांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करून त्यासाठी जबाबदार अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे.

आर्थिक अडचणींमुळे आत्महत्या केल्याचा आरोप असलेल्या कंत्राटदारांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याची मागणीही करण्यात आली आहे.

# १५ दिवसांपासून वारंवार वीजपुरवठा खंडित

## वीजपुरवठा सुरळीत नागरिकांची मागणी

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**हिवरखेड** – परिसरात मागील १५ दिवसांपासून विजेचा लपंडाव सुरू असून वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. दिवसभरातून अनेक वेळा वीज ये-जा करत असल्याने घरगुती कामांसह विविध व्यवसायांवरही त्याचा परिणाम होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे. सततच्या वीज खंडित होण्यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत असून, लहान व्यावसायिक, दुकानदार तसेच ऑनलाइन काम करणाऱ्या नागरिकांनाही अडचणींचा सामना करावा लागत आहे. वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत होण्यासाठी बराच वेळ लागत असल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळी अचानक वीज गायब होत असल्याने नागरिकांना गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे. वारंवार होणाऱ्या या वीजपुरवठ्याच्या समस्येची संबंधित विभागाने तातडीने दखल घेऊन वीजपुरवठा खंडित होण्यामागील कारणांचा शोध घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. पंधरा दिवसांपासून सुरु असलेला विजेचा हा लपंडाव थांबवून हिवरखेडकरांना सुरळीत व नियमित वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने तातडीने आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे.

## वैद्यकीय सुविधांचा अभाव

# बारा हजार लोकसंख्येचे हिवरखेड गाव डॉक्टरविना

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**हिवरखेड** – हिवरखेड गावाची लोकसंख्या सुमारे बारा हजार असून एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या गावात एकही एम.बी.बी.एस. किंवा बी.ए.एम.एस.पदवीधारक डॉक्टर उपलब्ध नसल्याची बाब समोर आली आहे. त्यामुळे गावातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला असून वैद्यकीय सुविधांचा अभाव जाणवत आहे.



हिवरखेड गावात बिगर पदवीधारक डॉक्टरांकडून उपचार केले जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे. योग्य वैद्यकीय मार्गदर्शन आणि तज्ज्ञ उपचारांची आवश्यकता असताना नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये निष्काळजीपणा होऊ नये, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. गावात सध्या चार मेडिकल आणि एक जेनेरिक मेडिकल, अशी एकूण पाच औषधांची दुकाने असल्याचे सांगण्यात येते. मात्र, औषधांची दुकाने उपलब्ध असूनही पदवीधारक डॉक्टरांची सुविधा नसल्याने नागरिकांना उपचारासाठी बाहेरगावी जावे लागत आहे.

हिवरखेड येथील नागरिकांना उपचारासाठी लोणी, मोर्शी, वरूड, अमरावती तसेच नागपूर यांसारख्या ठिकाणी जावे लागत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. यामुळे रुग्णांना आर्थिक भुर्दंड, प्रवासाचा त्रास आणि वेळेचा अपव्यय सहन करावा लागत आहे.

# संत्रा मृगबहार असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

## युवा शेतकरी संघ टेंभुरखेडाच्या वतीने जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – दुष्काळ परिस्थिती असता संत्रा मृगबहार तोडून फेकत असल्यामुळे होणाऱ्या नुकसानीचे पंचनामे करुन संत्रा मृगबहार असलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत मिळावी, अशी मागणी युवा संत्रा शेतकरी बागायतदारांच्या वतीने एका निवेदनाव्दारे जिल्हाधिकारी यांचेकडे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वरुड तालुका परिसरातील शेतकरी मोठ्या प्रमावर संत्रा पिकावर अवलंबुन आहेत. यावर्षी मृग बहारासाठी आवश्यक त्या प्रमाणात पाऊस न झाल्यामुळे मृग संत्रा बागांवर गंभीर परिणाम झाला आहे.



मृग बहारासाठी योग्यवेळी आणि पुरेशा प्रमाणात पाऊस होणे अत्यंत आवश्यक असते मात्र यावर्षी पावसाचे प्रमाण कमी राहल्याने जमिनीतील ओलावा कमी झाला असून विहीरी बोअरवेल व इतर जलस्त्रोतांची पाणीपातळी ही खालावली आहे, परिणामी भविष्यात संत्रा झाडे जगविण्यासाठी शेतकरी स्वतः मजुर लावुन लाखोंच्या संख्येने संत्रा फळे तोडून फेकत असल्यामुळे अपेक्षित उत्पन्न न मिळाल्यास शेतकऱ्यावर आर्थिक संकट ओढवणार आहे, त्यामुळे या परिस्थितीची गांभीर्याने विचार करुन वरुड तालुका मृग संत्रा उत्पादक शेतकऱ्यांच्या बागांचे तातडीने सर्वेक्षण व पंचनामे करण्यात यावे तसेच कमी पावसामुळे मृग बहराचे नुकसान झालेल्या पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या निकषानुसार आर्थिक नुकसान भरपाई विशेष मदत मिळुन द्यावी, अशी मागणी युवा शेतकरी संघ टेंभुरखेडाच्या वतीने मनोज माहुलकर, संदीप देशमुख, सुशील देशमुख, भुपेश देशमुख, देवांग देशमुख, डॉ.शशीभुषण उमेकर, हर्षवर्धन आजने, डॉ.अमोल कोहळे , मनोज देशमुख, मुकेश देशमुख, भुषण देशमुख, निरज सालबर्डे, शुभम कराळे, देवेंद्र लुंगे, दिलीप हुरडे, शुभम भोपती, राहुल देशमुख, शरद काळे, विलास देशमुख, सौरभ देशमुख, कुणाल गीद, रवी वानखडे, संजय गायकवाड, अरुण जारी, सागर देशमुख, विकास बंदे आदींनी केली आहे.

## आर.जी.देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात

# महात्मा गांधी आणि लाल बहादूर शास्त्री यांची जयंती

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**चांदस वाठोडा** – येथील आर.जी.देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वातंत्र्य भारताचे माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एच.एस.सी.व्हि.सी.विभागप्रमुख प्रा.मोहन तंबाखे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.उमेश कडू, प्रा. राहुल देशमुख आणि प्रा.श्रीमती विरखडे उपस्थित होत्या.



कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली.

कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. विरखरे यांनी केले.प्रमुख अतिथी प्रा.उमेश कडू यांनी महात्मा गांधी यांच्यावरील झालेल्या आरोपांचे खंडन करीत गांधीजी मजबूत विचारसरणीचं व्यक्तिमत्व असून जागतिक लौकिक प्राप्त व्यक्ती आहे.

त्यामुळे त्यांचे विचार अंगीकारणे आज काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. यानंतर प्रा.राहुल देशमुख, प्रा. मोहन तंबाखे मनोगत व्यक्त केले.

यावेळी योगेश श्याम धुर्वे, दुर्गा राजू ढोमणे, शीतल येवूतकर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

संचालन विद्यार्थिनी तन्वी रमेश साबळे आणि राची सुनील सलामे तर उपस्थितांचे आभार कीर्ती संजय निंबुरकर आणि शीतल प्रमोद येवूतकर यांनी मानले.

## जरूड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये

# जागतिक पोषण आहार सप्ताह निमित्त कार्यक्रम

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – श्री शिवाजी शिक्षण संस्था अमरावती द्वारा संचलित व संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा संलग्नित जरुड येथील कला व वाणिज्य महाविद्यालयामध्ये प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या मार्गदर्शनाखाली अर्थशास्त्र विभागातर्फे नुकताच आहार पोषण सप्ताह उत्साह साजरा करण्यात आला. प्राचार्य डॉ.जी.आर.तडस यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उदघाटन करण्यात आले. गृह अर्थशास्त्राच्या विभाग प्रमुख प्रा.ज्योती



मरस्कोल्हे यांच्या नियोजनातून डिश-डेकोरेशन, रांगोळी स्पर्धा, पुष्परचना स्पर्धा,मेहंदी स्पर्धा,रानभाजी आणि हस्तकला प्रदर्शनी स्पर्धा घेण्यात आल्या. डिश डेकोरेशन स्पर्धेमध्ये विद्यार्थिनी पौष्टिक पदार्थाची आकर्षक मांडणी करत या स्पर्धेमध्ये बी.ए.भाग व बी.एस्सी.भागच्या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या स्पर्धेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये पोषण संतुलित आहार, पारंपरिक आहार, सर्जनशीलता व कौशल्य विकासाबाबत जागृती करण्यात आली. याप्रसंगी प्राचार्य डॉ.जी.आर.तडस, डॉ.व्ही.एच.भटकर, डॉ.राम कुलसंगे, डॉ.रविकांत महिंदकर, डॉ.अजय कुकडे, डॉ.विष्णु पडवाल, डॉ.शशिकांत काळे, डॉ.प्रज्ञा निंभोरकर, डॉ.पूजा महाले प्रा.ज्योती मरस्कोल्हे, प्रा.प्रदीप आवारे, प्रा.लीलाधर चौधरी, प्रा.रेणुका वानखडे, प्रा. समीक्षा बिडकर, प्रा.सीमा कानडे, प्रा.तेजश्री घोटकर, प्रा.रुपाली सवई, श्वेता लोखंडे, प्रमोद पाटील, निलेश खुरद, अर्चना राऊत, संतोष चव्हाण, निलेश बंदे, दुर्गा हरले, अनिल हरले इत्यादी उपस्थित होते.

# पोलिसांसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**मुंबई** – राज्य पोलीस दलातील अधिकारी, कर्मचाऱ्यांचा त्यांच्या साहसी कामगिरीबद्दल 'मुख्यमंत्री शौर्य पदक' देऊन गौरव करण्यात येणार आहे.



राज्य मंत्रिमंडळाच्या मंगळवारी झालेल्या बैठकीत खाकी वर्दीच्या धाडसाला सलाम करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार कर्तव्य बजावताना जोखीम पत्करून केलेल्या कामगिरीसाठी मुख्यमंत्री शौर्य पदक विजेत्यांना रोख ५० हजार रुपये, पदक तसेच प्रशस्तीपत्र मिळणार आहे. दरवर्षी महाराष्ट्र दिनाच्या पूर्वसंध्येला मुख्यमंत्री शौर्य पदकांची घोषणा करण्यात येईल. दरवर्षी शौर्य पदकांची निश्चित अशी संख्या राहणार नाही, तर राज्यभरातील क्षेत्रीय स्तरावरील कामगिरींबाबतचे अहवाल आणि येणाऱ्या प्रस्तावांच्या अधीन राहून पदके जाहीर केली जातील. मुख्यमंत्री शौर्य पदक मरणोत्तरही देण्याची तरतूद करण्यात आली. देशातील इतर राज्यांच्या धर्तीवर महाराष्ट्रात मुख्यमंत्री शौर्य पदक दिले जाणार आहे.

## डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील

# राशी व अर्णवीची तायक्कांडो मध्ये राज्यस्तरावर निवड

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

**वरुड** – स्थानिक नवयुवक शिक्षण संस्था अंतर्गत डॉ.मीना बंदे आदर्श इंग्लिश स्कूल येथील दोन विद्यार्थिनींनी नुकत्याच अकोला येथे झालेल्या विभागीय तायक्कांडो स्पर्धेमध्ये घवघवीत यश संपादन करून राज्यस्तरावर निवड झालेली आहे. पुन्हा एकदा या विद्यार्थिनींनी शाळेच्या यशात मानाचा तुरा रोवला.

विभागीय स्तरावर झालेल्या १४ वर्षे वयोगटाखालील तायक्कांडो स्पर्धेत राशी सुधीर इंगोले व १७



वर्षे वयोगटाखाली तायक्कांडो स्पर्धेत अर्णवी अक्षय देशमुख या विद्यार्थिनींची विभागीय तायक्कांदो स्पर्धेत विजयी होऊन राज्यस्तरीय तायक्कांडो स्पर्धेत निवड झाली आहे. या यशाबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या विजयी विद्यार्थिनींचे नवयुवक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष संजय गणोरकर, उपाध्यक्ष पुरुषोत्तम कळमकर, सचिव जगदीश नेरकर व संस्थेचे सर्व पदाधिकारी, शाळेच्या मुख्याध्यापिका नीता चिमोटे आदर्श मराठी प्रायमरी शाळेचे मुख्याध्यापक नितेश वाघमारे तसेच शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील यशासाठी शुभेच्छा दिल्या. आपल्या यशाचे श्रेय मार्गदर्शक , आई वडील व क्रीडा शिक्षक शुभम कडू यांना देतात.

## शांतिनिकेतन इंग्रजी शाळा येथे

# महात्मा गांधी यांनी लाल बहादूर शास्त्री जयंती

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

**वरुड** – राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि माजी पंतप्रधान लाल बहादूर शास्त्री या दोन्हीही महापुरुषाची जयंती शांतिनिकेतन इंग्रजी शाळा येथे साजरी करण्यात आली.

यावेळी शिक्षक अजय पारधी यांनी गांधींचे जग पातळीवरील विचार तसेच शास्त्री यांचे साधी राहणी आणि उच्च विचार या प्रमुख बाबीवर विचार मांडले तसेच शाळेतील



चंद्रशेखर दारोकर, गणेश असलकर आणि गौरव मोडक यांनी त्यांच्या प्रतिमेची पूजन करून त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी मुख्याध्यापक विवेक ठवळी, उपमुख्याध्यापिका शालिनी देशमुख आणि सर्व शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे संचालन गौरव मोडक तर आभार चंद्रशेखर दारोकर यांनी मानले.

# संपादकीय

**आपले ध्येय ठरवा, आणि त्यासाठी मेहनत करा.**

## शब्द आणि अभिनयाचा बेताज बादशाह: नाना पाटेकर

नाना पाटेकर यांचे आज, ८ ऑक्टोबर २०२६ रोजी, गोव्यात दोनापावल येथील निवासस्थानी हृदयविकाराच्या झटक्याने पहाटे वयाच्या ७५व्या वर्षी निधन झाले. ही दुःखद बातमी समजली. भारतीय चित्रपटसृष्टी आणि रसिक मनावर आपल्या अफाट अभिनयाने आणि परखड व्यक्तिमत्त्वाने अधिराज्य गाजवणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनामुळे कलाविश्वात आणि साहित्यिक वतुर्ळात एक कधीही भरून न निघणारी पोकळी निर्माण झाली आहे. जरी नाना पाटेकर प्रामुख्याने एक अष्टपैलू अभिनेते म्हणून जगभर प्रसिद्ध असले, तरी त्यांच्यातील संवेदनशील साहित्यिक, मवाळ विचारवंत आणि समाजमन ढवळून काढणारा एकोपा नेहमीच त्यांच्या संवादातून आणि लेखणीतून जाणवत राहिला.

**अभिनयापलीकडचे साहित्यिक रूप**



नाना पाटेकर म्हणजे केवळ पडद्यावरचा रागीट किंवा हुशार अभिनेता नव्हे; तो शब्दांचा एक असा कलावंत होता जो मोजक्या शब्दांत प्रचंड अर्थ सांगून जायचा. त्यांच्या भाषणांमधील, मुलाख्यांमधील आणि संवादांमधील मराठी भाषेचा बाज हा एखाद्या कसलेल्या साहित्यिकाच्या तोडीचा होता. सामान्य माणसाच्या वेदना, शेतकऱ्यांचे अश्रू आणि समाजातील ढोंगीपणावर त्यांनी आपल्या खणखणीत आवाजात कायम कठोर प्रहार केला. त्यांची प्रत्येक ओळ आणि प्रत्येक शब्द हा अनुभव आणि सत्याच्या ऐरणीवर तपासून आलेला असायचा.

**संवेदनशील मनाचा माणूस**

पडद्यावर रागीट दिसणारा हा माणूस खऱ्या आयुष्यात अत्यंत कोमल मनाचा आणि समाजशील होता. दुष्काळग्रस्त भागातील शेतकऱ्यांसाठी त्यांनी केलेले कार्य, सैनिकांप्रति असलेला नितांत आदर आणि 'नाम' फाउंडेशनच्या माध्यमातून उभी केलेली सामाजिक बांधिलकी ही त्यांच्या जगण्याची आणि साहित्याची खरी प्रतिकात्मक रूपे होती. त्यांनी नुसते विचार मांडले नाहीत, तर ते विचार प्रत्यक्षात जगून दाखवले.

**निर्माण झालेली पोकळी**

आज त्यांच्या जाण्याने केवळ एक महान कलाकार हरपला नाही, तर मराठी मातीशी एकनिष्ठ असलेला, अन्यायाविरुद्ध सडेतोड बोलणारा आणि तरुणांना जगण्याची नवी दिशा देणारा एक खंदा विचारवंत आपल्यातून निघून गेला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली ही पोकळी मोजता येण्यासारखी नाही. जरी नाना पाटेकर आज शारीरिकदृष्ट्या आपल्यात नाहीत, तरी त्यांचे विचार, त्यांचे कार्य आणि त्यांच्या नावाचे गारुड मराठी रसिक मनावर कायम राहिल.

**त्या महामानवाला विनम्र श्रद्धांजली.**

# शून्यातून विश्व उभे करणारा सच्चा दिलाचा माणूस : स्व.सुनील वागद्रे



काही माणसे आयुष्यात येतात आणि आपल्या कर्तृत्वाने स्वतःची ओळख निर्माण करतात; पण काही माणसे अशी असतात की, ते केवळ यश मिळवत नाहीत तर आपल्या स्वभावाने माणसांची मने जिंकतात. स्व.सुनील वागद्रे हे अशाच सच्चा दिलाच्या माणसांपैकी एक होते.

जरुड ता.वरुड येथील रहिवासी असलेले सुनील वागद्रे यांनी आपल्या जीवनाची वाटचाल संघर्षातून सुरु केली. परिस्थितीसमोर हार न मानता मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्यांनी शून्यातून आपले विश्व निर्माण केले. शासकीय कंत्राटदार म्हणुन त्यांनी आपल्या कार्याची स्वतंत्र ओळख निर्माण केली. त्यांच्या कारकिर्दीकडे पाहिले तर प्रतिकूल परिस्थितीतून उभे राहून यश संपादन करण्याची प्रेरणादायी कहाणी त्यामागे दिसून येते.

व्यवसायात यश मिळवितांना अनेक जण माणसांपासून दुरावतात मात्र सुनील वागद्रे यांचा स्वभाव त्याला अपवाद होता. पैसा, प्रतिष्ठा आणि व्यवसाय यापेक्षा माणुस आणि माणुसकी यांना त्यांनी अधिक महत्त्व दिले. त्यामुळे त्यांच्या संपर्कात आलेली अनेक माणसे त्यांच्याशी जोडली गेली.

त्यांच्या चेहऱ्यावर कायम असणारे हास्य ही त्यांची खास ओळख होती. कितीही व्यस्त असले तरी समोरच्या व्यक्तीशी आपुलकीने बोलणे, त्याची विचारपूस करणे आणि शक्य असेल तेव्हा सहकार्य करणे, हा त्यांचा स्वभाव होता. त्यांच्या बोलण्यात आपलेपणा होता आणि वागण्यात मोकळेपणा होता. त्यामुळे त्यांच्याशी पहिल्यांदा भेटणारी व्यक्तीदेखील काही वेळातच त्यांच्याशी जोडली जात असे.

सुनील वागद्रे यांनी आपल्या जीवनप्रवासात अनेक नाती कमावली. काही नाती रक्ताची होती, काही मैत्रीची होती, काही व्यावसायिक होती; मात्र प्रत्येक नात्यात त्यांनी विश्वास आणि आपुलकी जपली म्हणुनच त्यांच्याशी जोडलेल्या प्रत्येकाच्या आठवणीत सुनील वागद्रे यांचे एक वेगळे स्थान आहे.

त्यांचे व्यक्तिमत्त्व समजुन घेताना त्यांच्या व्यावसायिक यशाबरोबरच त्यांच्या माणुसकीकडे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरते. कंत्राटदार म्हणुन त्यांनी उभे केलेले काम, मिळिवलेली प्रतिष्ठा आणि निर्माण केलेली ओळख ही त्यांच्या कर्तृत्वाची बाजू होती तर संकटात सहकार्य करण्याची वृत्ती, मनमोकळेपणा आणि हसतमुखपणा ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची खरी श्रीमंती होती.

आयुष्याच्या प्रवासात प्रत्येक व्यक्ती आपल्या परीने अनेक स्वप्ने पाहत असते. काही स्वप्ने पूर्ण होतात, काही अपूर्ण राहतात. मात्र एखाद्या माणसाने आपल्या वाटचालीत किती माणसे जोडली, किती जिव्हाळ्याची नाती निर्माण केली आणि किती लोकांच्या आठवणीत आपले स्थान निर्माण केले, यावर त्याच्या जीवनाची खरी श्रीमंती ठरते. या अर्थाने सुनील वागद्रे यांनी आपल्या आयुष्यात मोठी माणुसकीची संपत्ती कमावली होती.

आज ते आपल्यात नाहीत, ही वस्तुस्थिती स्वीकारणे त्यांच्या आप्तेष्ट, मित्र आणि परिचितांसाठी निश्चितच अत्यंत वेदनादायी आहे. मात्र माणूस शरीराने दूर गेला तरी त्याने दिलेला प्रेमाचा स्पर्श, केलेले सहकार्य, सांगितलेले शब्द आणि सोबत घालवलेले क्षण आठवणी बनून कायम सोबत राहतात.

सुनील वागद्रे यांचा जीवनप्रवास आपल्याला एक गोष्ट नक्की शिकवुन जातो यश मिळविणे महत्त्वाचे आहेच पण त्या यशाच्या प्रवासात माणसे जोडणे त्याहून मोठे आहे. शून्यातून उभे केलेले त्यांचे विश्व कदाचित आज त्यांच्या अनुपस्थितीने शांत झाले असेल पण त्यांनी जोडलेल्या माणसांच्या मनात त्यांच्या आठवणींचा प्रकाश कायम राहणार आहे.

सतत हसतमुख राहणारा, मनाने सच्चा असणारा, प्रत्येकाशी जिव्हाळ्याने वागणारा आणि स्वतःच्या कर्तृत्वाने वेगळी ओळख निर्माण करणारा हा माणूस काळाच्या पडद्याआड गेला असला तरी सुनील वागद्रे हे नाव त्यांच्या माणुसकीच्या आठवणींमधून कायम जिवंत राहील. काही माणसे निघून जातात पण त्यांनी जोडलेली माणसे आणि त्यांच्या आठवणी कधीच निघून जात नाहीत.

स्व.सुनील वागद्रे यांच्या अकाली निधनाने त्यांच्या कुटुंबीयांसह मित्रपरिवार, सहकारी आणि त्यांच्याशी जिव्हाळ्याचे संबंध असलेल्या असंख्य व्यक्तींवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी कधीही भरुन निघणारी नाही. शून्यातून स्वतःचे विश्व उभे करण्याची जिद्द, कर्तृत्वाच्या जोरावर निर्माण केलेली ओळख, प्रत्येकाशी जपलेले जिव्हाळ्याचे संबंध, सहकार्याची भावना आणि सदैव हसतमुख राहण्याचा स्वभाव यामुळे स्व.सुनील वागद्रे यांचे व्यक्तिमत्त्व कायम स्मरणात राहील. माणसाचे आयुष्य किती मोठे होते यापेक्षा त्याने आपल्या आयुष्यात किती माणसे जोडली आणि त्यांच्या मनात किती आदर व आपुलकी निर्माण केली, हे अधिक महत्त्वाचे असते. या कसोटीवर स्व.सुनील वागद्रे यांचे जीवन निश्चितच समृद्ध होते. त्यांनी मागे ठेवलेल्या असंख्य आठवणी आणि माणुसकीची नाती हीच त्यांच्या जीवनाची खरी संपत्ती आहे.

त्यांचे अकाली जाणे ही त्यांच्या आप्तेष्टांसाठी कधीही न भरुन येणारी हानी आहे. काळ पुढे जाईल, जीवनाची वाटचाल सुरु राहील मात्र त्यांच्या सहवासाच्या आठवणी सदैव मनात जिवंत राहतील. त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील चांगुलपणा, कर्तृत्व आणि माणुसकी पुढील पिढ्यांसाठीही प्रेरणादायी ठरेल.

ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि त्यांच्या कुटुंबीयांना, आप्तेष्टांना व मित्रपरिवाराला हे दुःख सहन करण्याचे बळ देवो, हीच भावपूर्ण प्रार्थना. स्व.सुनील वागद्रे यांना विनम्र अभिवादन व भावपूर्ण श्रद्धांजली!

# अभिनयाचा 'नाना' हरपला : पडदा कायमचा पोरका झाला




भारतीय चित्रपटसृष्टीत काही कलाकार येतात, भूमिका करतात आणि काळाच्या पडद्याआड निघून जातात. मात्र काही कलाकार असे असतात की, ते केवळ भूमिका साकारत नाहीत, तर त्या भूमिकेला स्वतःचा चेहरा, आवाज आणि आत्मा देतात. नाना पाटेकर हे अशाच असामान्य कलाकारांपैकी एक होते. त्यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीने केवळ एक अभिनेता गमावलेला नाही; तर रंगभूमी, सिनेमा आणि सामाजिक जाणिवांचा एक बुलंद आवाज हरपला आहे. वयाच्या ७५व्या वर्षी गोव्यात त्यांचे निधन झाले. त्यांच्या जाण्याने कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.

नाना पाटेकर हे नाव उच्चारले की सर्वप्रथम आठवतो तो त्यांचा दमदार आवाज, तीक्ष्ण नजर, संवादफेकीतील विलक्षण ताकद आणि अभिनयातील अस्सलपणा. त्यांनी अभिनय कधीही केवळ दिखाव्यासाठी केला नाही. पडद्यावर ते दिसले की प्रेक्षकांचे लक्ष आपोआप त्यांच्याकडे खेचले जायचे. त्यांच्या चेहऱ्यावरील भाव, शरीरबोली आणि आवाजातील चढ–उतार हेच त्यांच्या अभिनयाचे प्रभावी माध्यम होते. म्हणूनच नानांना कोणत्याही एका चौकटीत बंदिस्त करता आले नाही.

मराठी रंगभूमी ही त्यांच्या अभिनयाची पहिली शाळा होती. रंगभूमीने त्यांना अभिनयाची शिस्त दिली आणि पुढे हिंदी–मराठी चित्रपटसृष्टीने त्यांच्या प्रतिभेला व्यापक व्यासपीठ दिले. 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'प्रहार', 'अब तक छप्पन', 'नटसम्राट' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका आजही प्रेक्षकांच्या स्मरणात आहेत. गंभीर भूमिका असो, खलनायकाची व्यक्तिरेखा असो किंवा विनोदी भूमिकाङ्कनानांनी प्रत्येक भूमिकेवर आपली स्वतंत्र छाप उमटवली.

'क्रांतिवीर'मधील त्यांचा आक्रमक आणि संवेदनशील नायक, 'परिंदा'मधील त्यांचा प्रभावी अभिनय आणि 'नटसम्राट'मधील गणपत बेलवलकर हा तर त्यांच्या कारकिर्दीतील एक मैलाचा दगड ठरला. 'नटसम्राट'मध्ये रंगभूमीवरील कलाकाराच्या आयुष्यातील यश, एकटेपणा, वेदना आणि आत्मसन्मान त्यांनी ज्या ताकदीने मांडला, त्यामुळे ही भूमिका त्यांच्या नावाशी कायमची जोडली गेली. त्यांच्यासाठी अभिनय म्हणजे केवळ व्यवसाय नव्हता; तो जगण्याचा एक भाग होता.

नानांच्या अभिनयाची सर्वात मोठी वैशिष्ट्यपूर्ण बाब म्हणजे अस्सलपणा. ते पडद्यावर 'अभिनय' करत आहेत असे अनेकदा जाणवतच नसे. ते पात्र बनून जगत असल्याचा भास व्हायचा. त्यांच्या संवादांमध्ये कृत्रिमपणा नव्हता. त्यांच्या आवाजात आक्रमकता होती, पण त्यामागे संवेदनशीलताही होती. म्हणूनच त्यांचा रागही प्रेक्षकांना खरा वाटायचा आणि त्यांचे दुःखही मनाला भिडायचे.

पण नाना केवळ पडद्यावरील कलाकार नव्हते. समाजाशी असलेली त्यांची नाळही तितकीच घट्ट होती. शेतकरी आणि ग्रामीण भागातील प्रश्नांशी त्यांचा संबंध होता. त्यांच्या सामाजिक कार्याची आणि शेतकऱ्यांसाठी केलेल्या प्रयत्नांचीही मोठ्या प्रमाणावर दखल घेतली गेली. त्यांच्या निधनानंतर अनेकांनी त्यांच्या कलात्मक योगदानासोबतच सामाजिक बांधिलकीची आठवण काढली आहे.

नानांची लोकप्रियता ही केवळ स्टारडमवर आधारित नव्हती. ते आपल्या स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखले जात. मनात आलेले बोलण्याची त्यांची पद्धत होती. त्यामुळे कधी त्यांचे विचार कौतुकास पात्र ठरले, तर कधी त्यावर चर्चा आणि वादही झाले. मात्र, स्वतःचे मत व्यक्त करण्याचे धैर्य त्यांनी कधी सोडले नाही. त्यांची ही स्पष्टवक्ती वृत्ती त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा अविभाज्य भाग होती.

आज नाना आपल्यात नाहीत, पण त्यांचा आवाज आहे, त्यांच्या भूमिका आहेत, त्यांचे संवाद आहेत आणि त्यांच्या अभिनयातून निर्माण झालेल्या असंख्य आठवणी आहेत. एखादा महान कलाकार गेल्यानंतर त्याची खरी कसोटी त्याच्या अनुपस्थितीत होते. काळ पुढे जातो, नवे कलाकार येतात, नवे चित्रपट बनतात; पण काही चेहरे आणि काही आवाज कधीच विसरले जात नाहीत. नाना पाटेकर हे त्यापैकीच एक नाव आहे.

महाराष्ट्र सरकारने त्यांच्या योगदानाचा गौरव करत पुण्याजवळ पूर्ण शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्याचा निर्णय घेतला आहे. रंगभूमी, मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टी तसेच सामाजिक क्षेत्रातील त्यांच्या योगदानाला ही आदरांजली आहे.

नाना पाटेकर यांचे जाणे म्हणजे एका कलाकाराचा अंत नाही; तर एका अभिनयशैलीचा, एका व्यक्तिमत्त्वाचा आणि एका युगाचा पडदा पडणे आहे. त्यांनी साकारलेल्या भूमिका पुढील पिढ्यांना अभिनयाची ताकद दाखवत राहतील. त्यांच्या आवाजातील ती धार, चेहऱ्यावरचा तो भाव आणि पात्रात शिरण्याची ती विलक्षण क्षमता पुन्हा पाहायला मिळणार नाही.

नाना पाटेकर गेले, पण 'नाना' नावाचा अभिनयाचा अध्याय संपलेला नाही. तो त्यांच्या चित्रपटांत, संवादांत आणि रसिकांच्या स्मरणात कायम जिवंत राहील. नाना पाटेकर हे नाव म्हणजे मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक स्वतंत्र पर्व. आपल्या दमदार आवाजाने, तीक्ष्ण नजरेने आणि सहजसुंदर अभिनयाने त्यांनी असंख्य भूमिका अजरामर केल्या. नायक, खलनायक, विनोदी व्यक्तिरेखा असो वा संवेदनशील पात्रङ्कप्रत्येक भूमिकेत त्यांनी स्वतःची वेगळी छाप निर्माण केली. रंगभूमीपासून सुरू झालेला त्यांचा प्रवास पुढे रुपेरी पडद्यावर पोहोचला आणि त्यांनी आपल्या अभिनयाची ताकद संपूर्ण देशाला दाखवून दिली. 'प्रहार', 'परिंदा', 'क्रांतिवीर', 'अब तक छप्पन', 'नटसम्राट', 'वेलकम' यांसारख्या चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका रसिकांच्या कायम स्मरणात राहतील.




वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# शेतकऱ्यांवर पशुधन विक्रीची नामुष्की

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## चाऱ्याअभावी जनावरांचे दर २५ टक्क्यांनी घसरले



**मुंबई** – दुष्काळाच्या झळांनी मराठवाड्यातील शेतकऱ्यांच्या जगण्याचे गणितच बिघडवून टाकले आहे. पिके करपली, पाण्याचे स्रोत आटले आणि आता गोठ्यातील पशुधनाच्या चाऱ्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पाणी आणि चारा टंचाईच्या भीतीने शेतकरी आपल्या गायी, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्या बाजारात विक्रीसाठी आणू लागले आहेत. परिणामी पशुधनाच्या मागणीत घट झाल्याने काही बाजारपेठांमध्ये जनावरांच्या विक्रीदरात तब्बल २० ते २५ टक्क्यांची घसरण झाली आहे. वर्षानुवर्षे मुलांप्रमाणे जपलेल्या जनावरांना कमी दरात विकण्याची वेळ आल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. राज्यातील ३५८ पैकी २६५ तालुक्यांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. मराठवाड्यातील ७६ तालुक्यांमध्ये कमी पाऊस आणि प्रदीर्घ कोरड्या हवामानामुळे पिण्याच्या पाण्यासह चाऱ्याची समस्या तीव्र होत आहे. काही भागांत उपलब्ध हिरवा चारा केवळ एक ते दोन महिने पुरेल, अशी स्थिती आहे. त्यामुळे चारा टंचाई आणखी तीव्र होण्यापूर्वीच शेतकरी पशुधन विकण्याचा मार्ग स्वीकारत आहेत.

# २०४७ पर्यंत भारत विकसित राष्ट्र : 'आम्ही हे करून दाखवू' : मोदींनी दिला नवा नारा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**नवी दिल्ली** – पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सत्तेत प्रमुख पदावर (मुख्यमंत्री ते पंतप्रधान) २५ वर्षे पूर्ण केल्याच्या निमित्ताने 'विकसित भारत संकल्प सभेत' एक नवीन नारा दिला आहे. 'आम्ही हे करून दाखवू' (वुई विल डू इट) असा आत्मविश्वास व्यक्त करत त्यांनी २०४७ पर्यंत भारताला एक विकसित राष्ट्र बनविण्याचा दृढ संकल्प सोडला आहे. मात्र, याचवेळी त्यांनी निवडणुकीदरम्यान होणाऱ्या जातीपातीच्या राजकारणावर आणि मतपेटीच्या राजकारणावर तीव्र चिंता व्यक्त केली आहे. मोदी यांनी आज बुधवारी सार्वजनिक प्रशासनातील २५ वर्षे पूर्ण केली. या निमित्ताने दिल्लीतील इंदिरा गांधी इनडोअर स्टेडियमवर एका कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, तेथे मोदींनी देशभरातील भाजपा कार्यकर्त्यांना व्हर्च्युअल माध्यमातून संबोधित केले. ७ ऑक्टोबर २००१ रोजी जेव्हा त्यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली होती, तेव्हा सार्वजनिक जीवनातील हा टप्पा आपण कधी गाठू, अशी कल्पनाही त्यांनी केली नव्हती. सरकारचे प्रमुख म्हणून देशाची सेवा करत असताना आज २५ वर्षे पूर्ण झाली आहेत, असे त्यांनी सांगितले.

या यशाचे श्रेय त्यांनी जनतेच्या अखंड आशीर्वादाला दिले आणि भाजप, एनडीए तसेच लोकशाहीवर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांचे आभार मानले.

## मुख्यमंत्र्यांनी घेतली शहांची भेट

# दुष्काळाबाबत भरीव मदत करण्याचे केंद्रीय गृहमंत्र्यांचे आश्वासन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**मुंबई** – दुष्काळाचा सामना करणाऱ्या महाराष्ट्राला नियमानुसार जास्तीत जास्त मदत करण्याचे आश्वासन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी दिल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी नवी दिल्लीत दिली. राज्य सरकारने २६५ तालुक्यात दुष्काळ जाहीर केला आहे. दुष्काळी तालुक्यांची संख्या आणखी वाढण्याची शक्यता आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री फडणवीस यांनी बुधवारी नवी दिल्लीत शहा यांची भेट घेतली. यावेळी शहा यांना केंद्राला पाठवलेल्या प्रस्तावाची प्रत देण्यात आली. केंद्रीय गृहमंत्री हे एनडीआरएफचे अध्यक्ष असतात. तसेच दुष्काळाबाबत जी मंत्री समिती मदतीची घोषणा करते, त्या समितीचेही अध्यक्ष असतात, असे फडणवीस म्हणाले. केंद्रीय कृषीमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी तर राज्यातील दुष्काळाची बातमी कळताच आपल्याशी स्वत:हून संपर्क केला. महाराष्ट्राला सर्वतोपरी मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केंद्राचे पथक पाहणीसाठी येणार आहे. स्वतः चौहान देखील महाराष्ट्राचा दौरा करणार असल्याचे मुख्यमंत्री म्हणाले.

इतर नुकसानीच्या निकषात राज्यातील काही तालुके बसत नव्हते. पण अशा २० तालुक्यांनाही पीक नुकसानीच्या आधारावर मदत करण्यात येणार आहे. २००१ पासून आतापर्यंत दुष्काळ हा कायम नोव्हेंबरच्या अखेरीस किंवा डिसेंबरच्या सुरूवातीला जाहीर झाला आहे. पण यावर्षी आपण आधीच दुष्काळ जाहीर केला आहे, असे फडणवीस म्हणाले.

## महात्मा फुले कला, वाणिज्य व सीतारामजी चौधरी विज्ञान महाविद्यालयात

# आपत्ती व्यवस्थापन आणि सज्जता प्रशिक्षण कार्यक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



**वरुड** – नैसर्गिक आपत्ती आणि मानवनिर्मित संकटांना तोंड देण्यासाठी समाज सज्ज व्हावा यासाठी एन.जी.ओ. अंतर्गत नॅशनल मॅनेजमेंट टेनिग मुंबई या आपत्ती व्यवस्थापन आणि सज्जता प्रशिक्षण कार्यक्रम २०२६-२७ या कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिलीप हांडे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आले. सदरील कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून मोहम्मद शाहीद अली, अमरावती, तर कनिष्ठ महाविद्यालयातील प्रा. रविंद्र वैद्य, डॉ.चत्रभूज कदम, वैशाली गेडेकर, कविता चौधरी, डॉ.पुरूषोत्तम गेडाम, जितेश खडसे हे उपस्थित होते.

आपत्ती व्यवस्थापन आणि सज्जता प्रशिक्षण कार्यक्रम या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख वक्ते मोहम्मद शाहीद अली यांचा परिचय डॉ.चत्रभूज कदम यांनी करून दिला. तर प्रमुख वक्ते यांचे स्वागत प्रा. रवींद्र वैद्य यांनी केले. त्यानंतर प्रमुख वक्ते मोहम्मद अली यांनी महाविद्यालयातील इयत्ता अकरावी व बारा-वीच्या विद्यार्थ्यांना आपत्ती व्यवस्थापन आणि सज्जता याविषयी मार्गदर्शन करतांना आपत्ती म्हणजे काय, आपत्तीचे विविध प्रकार याबद्दलची माहिती दिली. तसेच त्यांनी विद्यार्थ्यांना प्राथमिक उपचार,भूकंप, पूर, वादळ,आग, दुष्काळ, पर्यावरणातील वाढते तापमान,आपत्कालीन स्थलांतर, सुरक्षित निवारा आणि बचावकार्य इत्यादी बाबत माहिती देऊन काही प्रात्यक्षिक कार्यही करून दाखवले.

कार्यक्रमाच्या समारोप प्रसंगी प्राचार्य डॉ. दिलीप हांडे म्हणाले की, भूकंप, पूर, आग, वादळ अशा कोणत्याही आपत्तीच्या वेळी घाबरून न जाता योग्य पावले उचलणे महत्त्वाचे आहे. यासाठी शालेय व महाविद्यालयीन स्तरावरच विद्यार्थ्यांना अशा प्रशिक्षणाची अत्यंत गरजेच आहे, असे म्हटले.कार्यक्रमात १५० हून अधिक विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे संचालन व आभार वैशाली गेडेकर यांनी केले.

## आर.जी.देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात

# महात्मा गांधी आणि लाल बहाद्दूर शास्त्री यांची जयंती

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**चांदस वाठोडा** – येथील आर.जी.देशमुख कनिष्ठ महाविद्यालयात राष्ट्रपिता महात्मा गांधी आणि स्वातंत्र्य भारताचे माजी पंतप्रधान लाल बहाद्दूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी एच.एस.सी.व्हि.सी.विभागप्रमुख प्रा.मोहन तंबाखे तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा.उमेश कडू, प्रा. राहुल देशमुख आणि प्रा.श्रीमती विरखडे उपस्थित होत्या. कार्यक्रमाची सुरुवात महात्मा गांधी आणि लालबहादुर शास्त्री यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकात प्रा. विरखरे यांनी केले.प्रमुख अतिथी प्रा.उमेश कडू यांनी महात्मा गांधी यांच्यावरील झालेल्या आरोपांचे खंडन करीत गांधीजी मजबूत विचारसरणीचं व्यक्तिमत्व असून जागतिक लौकिक प्राप्त व्यक्ती आहे. त्यामुळे त्यांचे विचार अंगीकारणे आज काळाची गरज आहे असे प्रतिपादन केले. यानंतर प्रा.राहुल देशमुख, प्रा. मोहन तंबाखे मनोगत व्यक्त केले. यावेळी योगेश श्याम धुर्वे, दुर्गा राजू ढोमणे, शीतल येवूतकर या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले.

संचालन विद्यार्थिनी तन्वी रमेश साबळे आणि राची सुनील सलामे तर उपस्थितांचे आभार कीर्ती संजय निंबुरकर आणि शीतल प्रमोद येवूतकर यांनी मानले.

# पुसला बसस्थानक परिसरात स्वच्छतागृह उभारा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

## युवा मित्र मंडळ पुसलाच्या वतीने मागणी



**वरुड** – पुसला बसस्थानक परिसरात स्वच्छतागृह उभारण्यात यावे, अशी मागणी युवा मित्र मंडळ पुसलाच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांचेकडे निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

पुसला हे गाव मोठ्या लोकसंख्येची असून त्याच्या आजु-बाजूस बरीच खेडे गाव लागून आहेत, प्रवास करते वेळी सर्व गावातील प्रवाशांना पुसला बस स्थानकावर यावे लागत असून समोरील प्रवास त्यांना तिथून करावा लागतो. त्यामुळे पुसला बस स्थानकावर नागरिक व महिलांची जास्त वर्दळ असते परंतु तिथे कुठल्याही प्रकारचे स्वच्छतागृह नसल्यामुळे नागरिक हे उघड्यावर जातात व महिलांची गैरसोय होते.

त्यामुळे आपण तात्काळ पुसला बसस्थानक येथे स्वच्छतागृह उभारा, असे निवेदन उपमुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांना दिले.

सदर निवेदन देतांना राष्ट्रीय ओबीसी किसान महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रकाश साबळे, युवा मित्र मंडळ पुसला अध्यक्ष सुरज धर्मे, सहसचिव धिरज सावरकर, राहुल तायडे, अजिंक्य काळे आदी उपस्थित होते.

# गुणवंत विद्यार्थी आणि मान्यवरांचा सत्कार समारंभ

## श्री गुरुदेव बहुउद्देशीय संस्थेचा उपक्रम

(प्रतिनिधी वरुड दर्पण)




**शेंदुरजनाघाट** – येथील श्री गुरुदेव बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा आणि मान्यवरांचा विशेष सत्कार समारंभ जनता शिक्षण संस्थेच्या सांस्कृतिक भवनात आयोजित करण्यात आला.

विदर्भ शेतकरी संघटनेचे नेते दिलीप भोयर यांचे अध्यक्षतेखाली व मान्यवरांच्या उपस्थितीत या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. वं.राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली.१० वी,१२ वीतील गुणवंत विद्यार्थी तसेच गावातील उच्चविद्याविभूषित विद्यार्थी व मान्यवरांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला. गावातील डॉ.श्रेयस राजू सरोदे यांनी आयुर्वेदामध्ये एमडी केल्याबद्दल, सारंग राजेंद्र बालपांडे यांनी सी.ए.ही परीक्षा उत्तीर्ण केल्याबद्दल तसेच अजिंक्य मनीष सावरकर यांनी समाजशास्त्र विषयात राष्ट्रीय प्राध्यापक पात्रता परीक्षा नेट उत्तीर्ण केल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांना सन्मानित करण्यात आले. तसेच समाजाविषयी तळमळीची जाणीव असणारे आणि गुरुदेव सेवा मंडळाला आर्थिक मदत देणारे गावातील वासुदेव श्रीखंडे तसेच गुरुदेव सेवा मंडळाच्या सक्रिय कार्यकर्त्या नीलिमा उमेश कुबडे नगरपरिषदेत नगरसेवक म्हणून निवडून आल्याबद्दल तसेच १० वी,१२ वीच्या बोर्डाच्या परीक्षेत सुयश प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व पुष्पगुच्छ देऊन याप्रसंगी सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी सी.टी.पठाण व ठाणेदार राहुल गवई यांनी विद्यार्थ्यांचे मनोबल तसेच मानसिक, शारीरिक व बौद्धिक विकासासंबंधी मौलिक मार्गदर्शन केले. मंडळाचे अध्यक्ष सेवानिवृत्त प्राचार्य एम.एम.घावट यांनी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी गुरुदेव सेवा मंडळाची भूमिका, कार्य आणि उपक्रमांची उपस्थितांना माहिती दिली.

विचारपीठावर जनता शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष अरुण काळे, उपाध्यक्ष सतीश सोलव, सचिव मोहन गणोरकर, सहसचिव चंद्रशेखर टाकरखेडे, संचालक ॲड.प्रभाकर सावरकर, राजेंद्र बेलसरे, अरुण फुटाणे, प्राचार्य डॉ.रा.ना.फुलारी, ठाणेदार राहुल गवई उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.बाबाराव ठाकरे, संचालन प्रीती नागपुरे व डॉ.करुणा आंडे यांनी तर आभार गीतांजली खरतडकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी मंडळाचे पदाधिकारी अनिल चौधरी, विजय फरकाडे, दिवाकर फरकाडे, किरण खरतडकर, सदाशिव बांबल, डॉ.अविनाश धोबे, डॉ.दिनेश खेरडे, सविता सावरकर, सविता काळे, शुभांगी तरार, शोभा फरकाडे, नीलिमा खेरडे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला गावातील प्रतिष्ठित मान्यवर, गुणवंत विद्यार्थी, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# पुणे-नांदेडमधील ‘महाज्योती’ व ‘वनार्टी’ची परीक्षा ऐनवेळी रद्द : केंद्रावर तांत्रिक गोंधळ, विद्यार्थ्यांचा संताप

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**पुणे** – महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) आणि स्व. वसंतराव नाईक संशोधन व प्रशिक्षण संस्था (वनार्टी) यांच्यामार्फत विविध स्पर्धा परीक्षांच्या पूर्व प्रशिक्षणासाठी घेण्यात येणाऱ्या चाळणी परी-क्षेच्यावेळी गोंधळ उडाल्याने पुणे आणि नांदेड केंद्रावरील परीक्षा रद्द करण्यात आली. बुधवारी पुण्यातील आंबेगाव बुद्रुक येथील परीक्षा केंद्रावर संगणक उपलब्ध नसल्याच्या तसेच संगणकीय प्रणालीवर लॉगिन करता येत नसल्याच्या तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या. तर, नांदेडमधील ’मराठवाडा ऑनलाइन एक्झाम सेंटर’मध्ये विजपुरवठा खंडित झाल्याने परीक्षा यंत्रणा बंद पडली. या गोंधळामुळे परीक्षा रद्द करण्यात आली. परीक्षा केंद्रांवर नियोजनशून्य कारभार परीक्षा केंद्रावर पुरेसे संगणक उपलब्ध नसणे, त्यात तांत्रिक अडचणी आणि विद्यार्थ्यांना वेळेत परीक्षा देता न येणे, अशा तक्रारी विद्यार्थ्यांनी केल्या आहेत. या प्रकारामुळे परीक्षा केंद्राबाहेर विद्यार्थ्यांची मोठी गर्दी झाली आणि विद्यार्थ्यांनी संताप व्यक्त केला. महाज्योतीने जारी केलेल्या परिपत्रकानुसार, ७ ऑक्टोबर २०२६ रोजी पुणे आणि नांदेडमधील संबंधित केंद्रांवर होणारी चाळणी परीक्षा रद्द करण्यात आली आहे. परीक्षा रद्द करण्याचं कारण मात्र यात नमूद नाही.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७०१/२०२६ ने.ता.२९/०९/२०२६**

**अर्जदार :-**

१) विश्वेश्वर संतोषराव अंबुलकर, वय अं.५३ वर्ष, धंदा-शेती
२) संतोष पुंजाजी अंबुलकर, वय अं.७० वर्ष, धंदा-शेती
क्र.१ व २ रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, जि.अमरावती
३) लता अण्णाजी देहनकर, वय अं.५१ वर्ष, धंदा-घरकाम
रा.पंचवटी काटोल, ता.काटोल, जि.नागपूर
४) वनिता दिलीप नपागपूरकर, वय अं.४८ वर्ष, धंदा-घरकाम
रा.बेलोना, ता.नरखेड, जि.नागपूर

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत सुमन संतोषराव अंबुलकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२९/०९/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख २७/०८/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ) ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८३३/२०२६ ने.ता.२१/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) दयाराम रामजी घोरपडे, वय अं.६५ वर्ष, धंदा-मजुरी
२) कांता दयाराम घोरपडे, वय अं.६० वर्ष, धंदा-मजुरी
३) रविंद्र दयाराम घोरपडे, वय अं.३४ वर्ष, धंदा-मजुरी
क्र.१ ते ३ रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत निलेश दयारामजी घोरपडे, रा.धनोडी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२१/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०१/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ) ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.९१९/२०२६ ने.ता.०७/११/२०२६**

**अर्जदार :-** १) नलिनी प्रल्हाद गाडबैल, वय अं.७६ वर्ष, धंदा-घरकाम, रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, २) योगेश प्रल्हाद गाडबैल, वय अं.४४ वर्ष, धंदा-शेती, रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, ३) अंजुश्री विनोद भोंगाडे, वय अं.४८ वर्ष, धंदा-नोकरी, रा.वरुड, ता.वरुड, ४) मंजुश्री प्रल्हाद गाडबैल, वय अं.३७ वर्ष, धंदा-नोकरी, रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत प्रल्हाद भिमरावजी गाडबैल, रा.गव्हाणकुंड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०७/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०१/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ) ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८३९/२०२६ ने.ता.२५/११/२०२६**

**अर्जदार :-** १) सुनिता नरेंद्र बैस (ठाकुर), वय अं.५५ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.प्रगती नगर, रायपुर, ता.जि.रायपुर, २) अभिजीत नरेंद्र बैस (ठाकुर), वय अं.३५ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी, रा.प्रगती नगर, रायपुर, ३) योगिता रविंद्र बैस (ठाकुर), वय अं.४६ वर्ष, धंदा-गृहिणी, रा.पंचमुखी नगर, मलकापुर, जि.बुलढाणा, ४) विश्वजीत रविंद्र बैस (ठाकुर), वय अं.२६ वर्ष, धंदा-खाजगी नोकरी, रा.पंचमुखी नगर, मलकापुर, ५) हर्षिकेश रविंद्र बैस (ठाकुर), वय अं.२१ वर्ष, धंदा-शिक्षण, रा.पंचमुखी नगर, मलकापुर, ता.मलकापुर

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुरेंद्र गुलाबसिंग बैस, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०३/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# केंद्राकडे १७ हजार कोटींच्या मदतीचा प्रस्ताव; कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांची माहिती; १२ ऑक्टोबरपर्यंत पंचनामे पूर्ण करणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)





**मुंबई** – ‘ज्यातील गंभीर दुष्काळी स्थिती पाहता शासकीय यंत्रणांना कोणतीही सुट्टी न घेता युद्धपातळीवर पंचनामे करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आतापर्यंत राज्यात ४४ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. येत्या १० ते १२ ऑक्टोबरपर्यंत पंचनाम्याचे काम १०० टक्के पूर्ण होईल. केंद्र सरकारकडे ‘एनडीआरएफ’च्या माध्यमातून मदतीसाठी १७ हजार कोटी रुपयांचा प्रस्ताव सादर केला जाणार आहेत. २६५ तालुक्यांव्यतिरिक्त आणखी १९ बाधित तालुक्यांचा समावेश दुष्काळी यादीत केला जात आहे’, अशी महत्त्वपूर्ण माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. कृषिमंत्री भरणे यांनी मंगळवारी पत्रकार परिषदेत राज्यातील पीक नुकसानीचे पंचनामे, केंद्रीय पथकाचा संभाव्य दौरा, चारा टंचाईचे नियोजन, ’महिला शेतकरी प्रमाणपत्र’ मोहीम आणि विधान परिषदेतील महायुतीचे जागावाटप यावर सविस्तर भाष्य केले.

पंचनाम्यांचा वेग वाढवला पंचनाम्यांच्या सद्य:स्थितीची अधिकृत आकडेवारी मांडताना कृषिमंत्री म्हणाले, ‘राज्यातील बाधित १ कोटी ४९ लाख हेक्टर क्षेत्रापैकी आतापर्यंत सरासरी ४४ टक्के पंचनामे पूर्ण झाले आहेत. छत्रपती संभाजीनगर विभागात सर्वाधिक ६८ टक्के, अमरावतीत ५५ टक्के, पुण्यात ३० टक्के आणि नागपूर विभागात २५ टक्के काम झाले आहे’.

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील दिवाणी न्यायाधीश ( कनिष्ठ स्तर ) वरुड, ( इन चॉर्ज श्री.व्ही.व्ही.राजुरकर साहेब ) यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.७८२/२०२६ ने.ता.१६/१०/२०२६**

**अर्जदार :-**

श्रीमती पंचफुला सुरेश सोनोने
वय अं.४७ वर्ष, धंदा-गृहिणी
रा.वार्ड क्र.६, जरुड, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत आकाश सुरेशराव सोनोने, रा.जरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि. /१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०९/०९/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वरुड येथील वि.वि.राजुरकर, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८५२/२०२६ ने.ता.०५/११/२०२६**

**अर्जदार :-**

१) संजय भाऊराव चौधरी, वय अं.६१ वर्ष, धंदा-शेती
२) नंदा दिलीप वानखडे, वय अं.५० वर्ष, धंदा-घरकाम
३) सुनिता मनोज चौधरी, वय अं.३८ वर्ष, धंदा-घरकाम
४) श्वेता मनोज चौधरी, वय अं.२० वर्ष, धंदा-शिक्षण
५) प्रचेत मनोज चौधरी, वय अं.१७ वर्ष, धंदा-शिक्षण
अर्जदार क्र.१ ते ५ रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**कोणी नाही :- गैरअर्जदार**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मय्यत भाऊराव लक्ष्मण चौधरी व प्रभावती भाऊराव चौधरी, रा.शेंदुरजनाघाट, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.०५/११/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०३/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील व्ही.व्ही.राजुरकर, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८०१/२०२६ ने.ता.२६/१०/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती रेखाताई रामदासजी पांडे, वय अं.६५ वर्ष, धंदा-गृहिणी, २) जयेश रामदास पांडे, वय अं.३४ वर्ष, धंदा-नोकरी, ३) शिल्पा रामदास पांडे, वय अं.४३ वर्ष, धंदा-गृहिणी, क्र.१ ते ३ रा.वरुड, ता.वरुड, ४) शुभांगी देवेंद्र उमक, वय अं.४७ वर्ष, धंदा- गृहिणी, रा.मसोरा, ता.नरखेड

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :- निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांना **मयत रामदास नारायणराव पांडे, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.२६/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख ०६/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर सहदिवाणी न्यायाधीश ( प्रभारी ), ( कनिष्ठ स्तर ), वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.८३७/२०२६ ने.ता.३०/१०/२०२६**

**अर्जदार :-**

१)श्रीमती.शोभा सुनिल डबरासे, वय अं.४८ वर्ष, धंदा-मजुरी
२)सौ.सरस्वती आत्माराम डबरासे, वय अं.७२ वर्ष, धंदा-गृहिणी
३)कु.काजल सुनिलराव डबरासे, वय अं.२२ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.वार्ड नं.२१, राजुरा नाका, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती
४)चि.दिग्वीजय सुनिलराव डबरासे, वय अं.२१ वर्ष, धंदा-शिक्षण
रा.१,२ व ४ रा.वार्ड क्र.६ आंबेडकर चौक, लोणी, ता.वरुड

**... विरुध्द ... गैरअर्जदार :- निरंक ( कोणीही नाही )**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत सुनिल आत्मारामजी डबरासे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ८, १८२७ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.३०/१०/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख ०१/१०/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार
सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

# “नाना” नावाचा अध्याय असनेर संपला...

# अभिनयाचा दिग्गज हरपला !

**परखड व्यक्तिमत्त्व, दमदार आवाज आणि अजगरास अभिमानाची ओळख असलेले ज्येष्ठ अभिनेता नाना पाटेकर यांचे निधन.**




